महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका/ **COVID-१९-३/११८३**
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : **२४/०४/२०२०**

# परिपत्रक

**विषय : महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६० वा वर्धापन दिन समारंभ - १ मे, २०२०.**

**संदर्भ :** सीईआर-२०२०/प्र.क्र.६५/३० दि. १५.०४.२०२०

महाराष्ट्र राज्य स्थापनेला दि. १ मे, २०२० रोजी ६० वर्षे पुर्ण होत आहेत. कोरोना (COVID-१९) या विषाणूचा संसर्ग टाळण्यासाठी या वर्षी राज्यात " **महाराष्ट्र दिन** " हा कार्यक्रम अत्यंत साधेपणाने आयोजीत करणेबाबत शासन परिपत्रक सीईआर-२०२०/प्र.क्र.६५/३० दि. १५.०४.२०२० अन्वये निर्देश दिले आहेत.

२. महाराष्ट्र शासनाच्या निर्देशांच्या धर्तीवर या वर्षी महावितरण कंपनीमध्ये " **महाराष्ट्र दिन** " अत्यंत साधेपणाने आयोजीत करण्यात यावा. तसेच सामाजिक अंतर राखण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेउन, जास्तीत जास्त ५ अधिकारी / कर्मचारी यांच्या उपस्थितीमध्ये ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न करण्यात यावा.

३. तसेच, " **महाराष्ट्र दिन** " या दिवशी आयोजीत करण्यात येणारा गुणवंत कामगार पुरस्कार वितरण सोहळा हा दि. १ मे, २०२० रोजी आयोजीत न करता सदरचा कार्यक्रम दि. १५ ऑगष्ट, २०२० रोजी आयोजीत करण्यात यावा.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

सोबत : शासन परिपत्रक

**(कमांडर शिवाजी इंदलकर) (से.नि.)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६० वा**
**वर्धापन दिन समारंभ - १ मे, २०२०**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : सीईआर-२०२०/प्र.क्र.६५/३०
राजशिष्टाचार शाखा, ३ रा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख : १५ एप्रिल, २०२०.

**शासन परिपत्रक**

महाराष्ट्र राज्य स्थापनेला दिनांक १ मे, २०२० रोजी ६० वर्षे पूर्ण होत आहेत. कोरोना विषाणूचा संसर्ग टाळण्यासाठी, यावर्षी राज्यात " **महाराष्ट्र दिन** " हा कार्यक्रम अत्यंत साधेपणाने आयोजित करण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत:-

१. राज्यातील मंत्रालय व सर्व जिल्हा मुख्यालयातील जिल्हाधिकारी कार्यालये या ठिकाणी एकाच वेळी सकाळी ८.००वा. **फक्त ध्वजारोहण** करण्यात यावे.
२. या ठिकाणी केवळ पालकमंत्री, जिल्हाधिकारी, पोलिस अधिक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद एवढयाच पदाधिकारी/ अधिकारी यांनी उपस्थित रहावे.
३. इतर मान्यवरांना आमंत्रित करण्यात येवू नये.
४. कवायतीचे आयोजन करण्यात येवू नये.
५. विधीमंडळ,मा.उच्च न्यायालय व इतर संविधानिक कार्यालयांमध्ये कमीत कमी उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात यावे.
६. ध्वजारोहण करणारे पालकमंत्री महोदय काही अपरिहार्य कारणामुळे कार्यक्रमस्थळी उपस्थित राहू न शकल्यास, जिल्हा मुख्यालयी जिल्हाधिकारी यांनी ध्वजारोहण करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

**(रा.गो.गायकवाड)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**
मुख्य सचिव,
सर्व अपर मुख्य सचिव,
सर्व प्रधान सचिव / सर्व सचिव, मंत्रालयीन विभाग,
मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव,
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,

Scanned with CamScanner